**MHRG060012622022**

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | ०१/१०/२०२२ |
| नोंदणी तारीख | : | ०१/१०/२०२२ |
| निकाल तारीख | : | २३/११/२०२४ |
| कालावधी | : | **वर्षे महिने दिवस** |
| | | ०२ ०१ २२ |

**पेण येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात, ता. पेण, जि. रायगड.**

(पीठासीन अधिकारी – श्रीम. एस. के. टोनपे)

सीएनआर : एमएचआरजी ०६–००१२६२–२०२२

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ४८३/२०२२**

**निशाणी क्र. ३/क लगत**

महाराष्ट्र राज्य )
(द्वारा : ठाणे अंमलदार, वडखळ पोलिस ठाणे ) )... **अभियोग पक्ष**
)

विरुध्द

**ताई भरत मोकल** )
वय ४५ वर्षे, )
रा. वडखळ, ता. पेण, जि. रायगड. )..... **आरोपी**

**महाराष्ट्र मद्यनिषेध अधिनियम, कलम ६५ (ई) अन्वये**

**विधीज्ञ :**

वि. सहाय्यक सरकारी अभियोक्ता ................ श्री. एस. वाय. नाईक

आरोपीतर्फे वि. वकील ................ श्रीमती एम. वाय. म्हात्रे

## : न्यायनिर्णय :

(घोषीत दिनांक २३ नोव्हेंबर २०२४ रोजी)

आरोपीस महाराष्ट्र मद्यनिषेध अधिनियम, कलम ६५ (ई) अन्वये अपराधाकरीता संपरीक्षीत केले आहे.

०२. प्रस्तुत प्रकरणातील अभियोग पक्षाचे कथन, आरोपीचा बचाव, अभिलेखावर आलेला तोंडी व लेखी पुरावा तसेच आरोपीवर ठेवण्यात आलेल्या गुन्ह्याच्या तपशिलाचा विचार करता माझे समक्ष पुढील मुद्दे उपस्थित असून त्याचे निष्कर्ष मी त्यापुढे नोंदविण्यात आलेल्या कारणाकरीता नोंदविले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने असे शाबीत केले का की, आरोपी ही दिनांक ३०.०८.२०२२ रोजी १९.३० वाजण्याचे सुमारास मौजे वडखळ येथील तिचे घराचे समोर विनापरवाना, अवैधरित्या एका १५ लिटर क्षमतेच्या सफेद रंगाच्या प्लॅस्टिकच्या कॅनमध्ये १२ लिटर गावठी हातभट्टीची दारु जवळ बाळगून त्याची चोरुन विक्री करीत असताना मिळून आली ? | **...नकारार्थी** |
| २. | काय आदेश? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## का र ण मि मां सा

०३. प्रस्तुत प्रकरणात आरोपीविरूध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग

पक्षातर्फे एकूण चार साक्षीदार नामे साक्षीदार क्र. १ पंच जनार्दन मधुकर पाटील, साक्षीदार क्र. २ फिर्यादी तृप्ती जितेंद्र चवरकर, साक्षीदार क्र. ३ मंगेश राजाराम धुपकर व साक्षीदार क्र. ४ तपासी अंमलदार दर्शना हर्षद पाटील यांना तपासले. मी दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

**<u>मुद्दा क्रमांक १ करिताः–</u>**

**०४.** महाराष्ट्र मद्यनिषेध अधिनियम कलम ६५(ई) नुसार आरोपीला दोषी ठरविण्यासाठी अभियोग पक्षाने असे सिद्ध करणे आवश्यक आहे की, आरोपी ही दिनांक ३०.०८.२०२२ रोजी १९.३० वाजण्याचे सुमारास मौजे वडखळ येथील तिचे घराचे समोर विनापरवाना, अवैधरित्या एका १५ लिटर क्षमतेच्या सफेद रंगाच्या प्लॅस्टिकच्या कॅनमध्ये १२ लिटर गावठी हातभट्टीची दारु जवळ बाळगून त्याची चोरुन विक्री करत असताना मिळून आली. आरोपीविरुध्द आरोप सिद्ध करण्यासाठी आरोपीच्या ताब्यातून जप्त केलेला मुद्देमाल हा पंचनाम्यावरील साक्षीदार तपासून भारतीय साक्ष पुरावा कायदा, १८७२ प्रमाणे सिद्ध करणे आवश्यक आहे. तसेच जप्त करण्यात आलेला मुद्देमाल हे मादक द्रव्य होते असे रासायनिक तज्ञांच्या अहवालावरुन सिद्ध करणे आवश्यक आहे.

**०५.** अभियोग पक्षातर्फे याकामी तपासण्यात आलेल्या साक्षीदार क्र. १ श्री. जनार्दन मधुकर पाटील पंच साक्षीदार यांनी अभियोग पक्षास सहाय्य केले नाही. त्यांना उलटतपासामध्ये विचारण्यात येतील असे प्रश्न विचारण्याची अभियोग पक्षास संधी देण्यात आली परंतू अभियोग पक्षास ठोस असे काहीही अभिलेखावर आणण्यास अभियोग पक्षास अपयश आले.

**०६.** साक्षीदार क्र. २ म्हणून प्रकरणातील फिर्यादी तृप्ती जितेंद्र चवरकर यांनी त्यांच्या साक्षीदरम्यान दोन पंचांसहित बातमीच्या ठिकाणी छापा मारण्याचे कथन केले. घटनास्थळी त्यांना आरोपी तिच्या पुढयात सफेद रंगाचा प्लॅस्टिकचा कॅन घेऊन बसलेली दिसली. सदर कॅनमध्ये त्यांना १२ लिटर गावठी हातभट्टीची दारु मिळून आली. सदर कॅनमधून १८० मिली दारुचा नमुना स्वच्छ काचेच्या बाटलीमध्ये घेऊन सिलबंद करुन जप्ती पंचनामा करण्यात आला. त्यांनी नि. क्र. ५ व ६ कडील फिर्याद सिद्ध केली. त्यांच्या उलटतपासादरम्यान त्यांनी नमुन्यासाठी घेतलेल्या बाटलीचा स्वतंत्र पंचनामा केला नसल्याचे मान्य केले. तसेच छाप्याआधी पोलिस पंटर पाठविला नव्हता व जिथे छापा मारला त्या जागेच्या मालकीची खात्री केली नसल्याचे मान्य केले.

**०७.** अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार क्र. ३ मंगेश राजाराम धुपकर यांनी साक्षीदार क्र. २ यांच्या साक्षीस पुरक साक्ष दिली. त्यांच्या उलटतपासादरम्यान विचारण्यात आलेल्या औपचारिक प्रश्नांना त्यांनी नकारार्थी उत्तरे दिली.

**०८.** अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदार क्र. ४ तपासी अंमलदार दर्शना हर्षद पाटील यांनी असे कथन केले की, तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे जाबजबाब नोंदवले, आरोपीला कलम ४१–अ प्रमाणे नि.क्र.९ ची नोटीस दिली. नमुना मुद्देमाल नि.क्र.७ च्या पत्रान्वये कलिना येथे न्यायवैद्यक प्रयोगशाळेमध्ये तपासणीकामी पाठविण्यात आला. नि.क्र.०८ कडे रासायनिक तपासणी अहवाल दाखल केला. आरोपीविरुद्ध सबळ पुरावा मिळून आल्याने न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

०९. न्यायाचे हे प्रस्थापित तत्व आहे की, पोलिस साक्षीदारांची साक्ष याबाबत ते साक्षीदार केवळ पोलिस असल्यामुळे कोणतेही प्रतिकूल अनुमान निघत नाही. मात्र पोलिस साक्षीदार यांची साक्ष सर्वच बाबतीत एकमेकांना पूरक असणे गरजेचे आहे. पोलिस साक्षीदारांच्या साक्षीमध्ये तफावत सापडल्यास अभियोग पक्षास घातक ठरु शकते. अभिलेखावर तपासण्यात आलेल्या सर्व पोलिस साक्षीदारांनी छाप्याबाबत एकमेकांना पुरक साक्ष दिली आहे. मात्र प्रकरणातील जप्त मुद्देमालाबाबत नमुना मुद्देमाल बाजूला काढून उर्वरित मुद्देमाल यांचा पंचनामा केल्याचे कथन केले आहे. अशा परिस्थितीत मुद्देमाल व नुमना मुद्देमाल हा सर्व साक्षीदारांच्या समक्ष सीलबंद झाल्याने पोलिस स्थानकामध्ये आल्यानंतर मुद्देमाल कारकून यांना प्रकरणातील नमुना मुद्देमालासहित संबंधितांनी सुपूर्द करणे गरजेचे होते. मुद्देमाल पावती सिद्ध झालेली नाही. ती सिद्ध करण्याची प्राथमिक जबाबदारी अभियोग पक्षाची आहे. स्वतंत्र पंच साक्षीदाराने अभियोग पक्षास सहकार्य केले नाही. तसेच पंचनामा सिद्ध झालेला नाही. अभियोग पक्षाच्या साक्षीदारांनी जरी छाप्याबाबत पूरक साक्ष दिलेली असली तरी प्रकरणातील जप्त मुद्देमाल तपासणीस पाठविण्यापर्यंत नमुना मुद्देमाल कोठे होता याबाबत अभियोग पक्षाचा कोणताही साक्षीदार साक्ष देत नाही. जप्ती पंचनामा सिद्ध झालेला नाही. तसेच प्रकरणात सी.ए. रिपोर्ट दाखल असला तरी तो सिद्ध झालेला नाही.

१०. अभिलेखावर आलेल्या पुराव्याचे अवलोकन केले असता, प्रकरणातील पंचनामा तसेच मुद्देमाल पावती सिद्ध झालेली नाही. त्यामुळे जप्त मुद्देमाल ही दारुच होती हे देखील सिद्ध झालेले नाही. उपरोक्त कारणमिमांसेचा विचार करता, गुन्हयात जप्त मुद्देमाल आरोपीच्या ताब्यातून जप्त केला व तो मुद्देमाल दारुच होती असे शाबित होऊ शकत नाही.

म्हणून मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्रमांक २ करिताः–**

**११.** उपरोक्त बाबींचा विचार करता अभियोग पक्ष आरोपीने गुन्हा केल्याचे सिद्ध करु न शकल्यामुळे मिळणारा संशयाचा फायदा आरोपीस मिळतो. त्यामुळे आरोपी सदर गुन्हयातील आरोपातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र झाली आहे. सबब, मी मुद्दा क्र. २ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारित करीत आहे.

## आ दे श

१) आरोपी नामे **ताई भरत मोकल,** रा. वडखळ, ता. पेण, जि. रायगड हिस महाराष्ट्र मद्यनिषेध अधिनियम कलम ६५(ई) अन्वये शिक्षेस पात्र गुन्ह्याच्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२) आरोपीचे वैयक्तिक बंधपत्र रद्द करण्यात येत असून तिच्या जामीनदारास त्याने दिलेल्या जामीनीतून मुक्त करण्यात येत आहे.

३) गुन्ह्यात जप्त मुद्देमाल अपिल कालावधी संपल्यानंतर राज्य उत्पादन शुल्क, अलिबाग – रायगड यांचे संबंधित कार्यालयास पुढील कारवाईसाठी पाठविण्यात यावा.

४) आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७(अ) अन्वये रक्कम रुपये १५,०००/– वैयक्तिक बंधपत्र व त्याच रकमेचा एक जामीन द्यावा.

खुल्या न्यायालयात घोषीत केले.

SANGITA KISANRAO TONPE
Digitally signed by SANGITA KISANRAO TONPE
Date: 2024.11.23 15:53:21 +0530

**स्थळः– पेण** **(एस. के. टोनपे)**

**दिनांकः– २३/११/२०२४** **प्रथमवर्ग न्यायदंडाधीकारी, पेण.**